## पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिवस सातवा

आज दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी 'बोपेम', 'तिथी', 'नानू अवनल्ला... अवलु', 'प्रेम कहाणी', 'गणवेश', 'हलाल', 'भो भो' या चित्रपटांच्या पत्रकार परिषदा 'पिफ बझार' या ठिकाणी पार पडली. या पत्रकार परिषदांचा सारांश खालीलप्रमाणे -

- बोपेम -

  - लहान मुलांची  विशेषता: आईविना पोरके झालेल्या मुलांची काळजी घेऊन त्यांची स्वप्ने पूर्ण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे" या एकाच भावनेतून 'बोपेम' चित्रपटाची निर्मिती करण्यात आली व चित्रपटाची कल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी दिग्दर्शकांनी कोणावर अवलंबून न राहता स्वत:चा पैसा खर्च केला असे या चित्रपटातील एक प्रमुख कलाकार अकिला कॉलीकेव्हा यांनी सांगितले.

  - हा चित्रपट अधिक परिणामकारक होण्यासाठी 'आई' आणि 'निसर्ग' यांची परस्परांशी प्रतीकात्मक तुलना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

  - सोव्हियत युनियन मधून बाहेर पडल्यानंतर कझाकस्तानात तरुण पिढीकडून अधिक चांगले चित्रपट निर्माण करण्यात आले असेही त्यांनी यावेळी सांगितले.

- तिथी -

  - प्रत्येक पिढीमध्ये विचारांचे आणि इतर बाबींचेही 'अंतर' असते. या अंतरावरच 'तिथी' चित्रपटात एका घटनेच्या अनुषंगाने भाष्य करण्यात आले आहे असे या चित्रपटाचे दिग्दर्शक राम रेड्डी यांनी सांगितले.

  - चौदाव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'जागतिक स्पर्धा' विभागात हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे.

  - पिढ्यांमधील अंतर स्पष्ट करण्यासाठी त्यांची तुलना ही आवश्यकच मानावी लागेल असे सांगून ते म्हणाले, प्रत्येक पिढीचा एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा असू शकतो. हा चित्रपट वास्तववादी होण्यासाठी खास लोकेशन्स निवडण्यात आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

- नानू अवनल्ला... अवलु -

  - 'लिंगबदल' हा आपल्या समाजातील सर्वात तिरस्करणीय विषय मात्र त्या विषयावर काढण्यात आलेल्या 'नान्नु अवनल्ला... आवलू' या कन्नड चित्रपटात गुंतागुंतीच्या मानवी जीवनावर सुंदर भाष्य करण्यात आले आहे, असे या चित्रपटातील एक प्रमुख कलाकार कुणाल पुणेकर यांनी सांगितले.

  - एक अभिनेता म्हणून कुणाल पुणेकर यांचा हा पहिलाच चित्रपट आणि तोही कन्नडमध्ये. त्यामुळे सुरुवातीला मला हे काम खूप अवघड वाटत होते मात्र मी या भूमिकेसाठी आधी कानडी शिकून घेतले. शिवाय 'हिजडा' या नाटकात मी आधी काम केले असल्यामुळे या विषयाची मला जाणीव होती. मात्र नाटकाच्या मानाने चित्रपटातील भूमिका खूप गंभीर होती. हा चित्रपट पाहिल्यानंतर अनेक कानडी प्रेक्षक रडले आणि तीच आमच्या कलाकृतीची पसंतीची पावती होती असेही त्यांनी सांगितले.

- प्रेम कहाणी -

- या चित्रपटामध्ये महाराष्ट्र आणि राजस्थानच्या संस्कृतीचा मिलाफ साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असे या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक सतीश रणदिवे यांनी सांगितले.

- याप्रसंगी निर्माते लालचंद शर्मा, संगीतकार प्रवीण कुंवर, मुख्य अभिनेत्री काजल शर्मा आणि ज्येष्ठ अभिनेत्री किशोरी शहाणे हे कलाकार उपस्थित होते.

- 'प्रेमकहाणी' ची कहाणी खूप वेगळी असून तिच्यामध्ये रहस्यासह अनेक गोष्टी लपलेल्या आहेत, असे सांगून दिग्दर्शक सतीश रणदिवे म्हणाले, ही कुतुहूल जागृत करणारी कथा प्रेक्षकांना नक्कीच पसंत पडणारी आहे. तर मराठी चित्रपट आता केवळ मराठी प्रेक्षक पाहत नाही तर त्यातील आशयामुळे इतर भाषिक प्रेक्षकही मराठीकडे वळत आहेत.

- या चित्रपटात मराठीबरोबरच हिंदी संवादही मोठ्या प्रमाणावर वापरण्यात आले आहेत, असे अभिनेत्री किशोरी शहाणे यांनी यावेळी सांगितले.

- गणवेश -

- आपल्या समाजातील काही लोक अजूनही इतके दारिद्र्यावस्थेत आहेत की, त्यांच्या कुटुंबातील मुलांना'गणवेश' घेणे परवडत नाही. गरीब पालकांच्या या अडचणीवरच 'गणवेश' चित्रपटात भाष्य करण्यात आले आहे, असे या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक छायालेखक आणि निर्माते अतुल जगदाळे यांनी सांगितले.

- प्रत्येक 'गणवेशा' मागे एक प्रवृत्ती असते त्यादृष्टीने 'गणवेशा'चे महत्व अधोरेखित करण्यात आले आहे असेही ते म्हणाले.

- चांगले चित्रपट निर्माण होण्यासाठी शासकीय अनुदान मिळण्याची गरज आहे असे मतही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना व्यक्त केले.

- याप्रसंगी चित्रपटाचे सहनिर्माते राजेश कुलकर्णी आणि शैलेंद्र आडकर उपस्थित होते.

- हलाल -

- हलाल' द्वारे मुस्लीम समाजातील 'तलाक' च्या संदर्भातील चुकीची प्रथा पडद्यावर मांडली.

- मुस्लिम समाजातील 'तलाक' च्या संदर्भातील एका जुनाट प्रथेवर 'हलाल' चित्रपटात भाष्य करण्यात आले आहे. मात्र त्यामागे धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू नाही महिलांच्या दृष्टीकोनातून तो एक समाजपरिवर्तनाचा प्रयत्न आहे, असे या चित्रपटाचे दिग्दर्शक शिवाजी लोटन पाटील यांनी सांगितले.

- याप्रसंगी या चित्रपटाचे कथालेखक राजन खान, निर्माते अमोल कांगणे आणि या चित्रपटात प्रमुख भूमिका करणारी अभिनेत्री प्रीतम कांगणे आदी उपस्थित होते.

- 'हलाल' चित्रपटात प्रथेनुसार चालत आलेली 'तलाक'ची पद्धत कशी चुकीची आहे एवढेच आम्ही दाखविले असे सांगून दिग्दर्शक शिवाज लोटन पाटील म्हणाले, चित्रपटाचा शेवट अनुकूल व्हावा या उद्देश्यानेच आम्ही कथेचा शेवट बदलला आहे, असेही त्यांनी सांगितले.

- कथालेखक म्हणून राजन खान यांनीही याप्रसंगी बोलताना त्याचे समर्थन केले.

- कथेच्या दृष्टीने तिचा शेवट वेगळा असला तरी चित्रपट हे वेगळे माध्यम असल्याने त्याचा शेवट कसा करावयाचा हे शेवटी दिग्दर्शकाचे स्वातंत्र्य आहे व ते मी त्यांना दिले होते, असे मत यावेळी राजन खान यांनी मांडले.

**भो भो** -

- घरात पाळलेला कुत्रा त्या घरातील महिलेला चावतो आणि महिला मृत्यू पावल्यामुळे सुरु होते एक आगळेवेगळे नाट्य, 'भो भो' या चित्रपटाची हीच आगळीवेगळी कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवते असा दावा या चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक आणि निर्माते भारत गायकवाड यांनी केला.

- या चित्रपटात केवळ कुत्र्याची गोष्ट नाही तर त्याची बाजू मांडणाऱ्या 'भोंडे' नावाच्या इसमाचीही आहे व ती'मोनोलॉग' पद्धतीने मांडण्यात आली आहे असेही त्यांनी सांगितले.

-चित्रपटाची कथा ही श्वानप्रेमावरची असल्याने हा चित्रपट करताना बऱ्याच अडचणीन तोंड द्यावे लागले हे त्यांनी ,मान्य केले. यातील भोंडे यांची भूमिका प्रशांत दामले करीत असून तब्बल सतरा वर्षानंतर ते रुपेरी पडद्यावर दिसणार आहेत.